# सतराव्या शतकातील ग्रंथांचे संगणकीकरण

## गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. १० : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत सतराव्या शतकापासूनचे दुर्मिळ ग्रंथ असून, या ग्रंथांचे संगणकीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प संस्थेतर्फे हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक प्रा. राजस परचुरे यांनी 'सकाळ'ला दिली.

'ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स'च्या साह्याने संगणकीय (डिजिटल) ग्रंथालयांची निर्मिती' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेस सोमवारी सुरवात झाली. त्याच्या उद्‌घाटनानंतर प्रा. परचुरे बोलत होते. इंडसर्च संस्थेचे संचालक प्रा. अशोक जोशी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. डॉ. नानाजी शेवाळे, प्रा. एआरडी प्रसाद या वेळी उपस्थित होते. आशा गद्रे आणि डॉ. प्रभाष रथ लिखित 'लायब्ररिअनशिप टुडे' या पुस्तकाचे, तसेच डॉ. नानाजी शेवाळे, प्रा. एआरडी प्रसाद लिखित ग्रंथालयशास्त्राशी संबंधित शोधनिबंधाचे प्रकाशन या वेळी झाले.

प्रा. परचुरे म्हणाले, ''ग्रंथालयात १९५० च्या पूर्वीचे तब्बल ६० हजार ग्रंथ आहेत. जुन्या ग्रंथांमध्ये अगदी सतराव्या शतकातील दुर्मिळ ग्रंथ, ब्रिटिशकालीन दस्तावेज, तत्कालीन विधिमंडळाचे अहवाल यांचा समावेश आहे. ग्रंथांचे संगणकीकरण करताना एकोणिसाव्या शतकापूर्वीच्या ग्रंथांना प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. २०१२ पर्यंत या ग्रंथांचे संगणकीकरण होणे अपेक्षित आहे.''

या प्रकल्पास बंगळूरच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अँड इकॉनॉमिक चेंज' आणि जर्मनीच्या बोटिंगन विद्यापीठाचे सहकार्य मिळत असल्याचे प्रा. परचुरे यांनी नमूद केले.

उद्‌घाटनाच्या सत्रात बोलताना प्रा. जोशी म्हणाले, ''अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत असताना ग्रंथालयाचे क्षेत्रही त्याला अपवाद नाही. पारंपरिक ग्रंथपालांना आता 'चीफ इन्फर्मेशन रिसोर्स ऑफिसर' अशी नवी भूमिका धारण करणे आवश्यक आहे. 'ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स'मुळे माहितीचे जलद प्रसारण शक्य झाले आहे. म्हणूनच माहितीचे-ज्ञानाचे जलद आदान-प्रदान होत असून अधिकाधिक नागरिकांना या नव्या तंत्रज्ञानाचा फायदा मिळेल.''

देशभरातील ३० ग्रंथालयांचे ग्रंथपाल, अधिकारी कार्यशाळेत सहभागी झाले असून, संस्थेत १३ ऑगस्टपर्यंत ही कार्यशाळा सुरू राहणार आहे.